# झिका व्हायरस

## झिका व्हायरस म्हणजे काय?

झिका व्हायरसचा प्रसार डासांमार्फत होतो. बाधित डासांच्या चाव्यामुळे मानवास त्याची बाधा होते.

## झिका व्हायरसचा प्रसार कसा होतो?

झिका व्हायरस मातेकडून गर्भावस्थेतील बालकांस लागण होते. लैंगिक संबंधातूनही एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीस लागण होऊ शकते. मौखिक, गुदमार्गे किंवा योनी मार्गे लैंगिक संबधाने पुरुष अथवा स्त्रियांना लागण होते.

## झिका व्हायरसची चिन्हे आणि लक्षणे काय आहेत?

कदाचित झिका व्हायरसची कोणतीही लक्षणे अथवा चिन्हे दिसतीलच असे नाही, अशी काही चिन्हे अथवा लक्षणे दिसल्यास ती पुढे 2 ते 7 दिवस टिकतात. ती पुढील प्रमाणे असू शकतील उदा.




1. घसादुखी,
2. ताप
3. पुरळ,
4. अंगाला खाज
5. स्नायू व सांध्यात वेदना होणे
6. डोळे लाल होणे आणि खाजणे

## झिका व्हायरसची लागण झाल्याचे निदान कसे करतात?

झिका व्हायरसची लागण झाल्याचे निदान Polymerase chain reaction (PCR) द्वारे करतात. आणि रक्तातून हा विषाणू वेगळा केला जातो. प्रचलित रक्ततपासणीप्रमाणेही तपासणी नसते.

## झिका व्हायरस लागणीवर उपचार कसे करतात?

झिका व्हायरस लागणीवर उपचार उपलब्ध नाहीत. त्याच्या लक्षणांवर नियंत्रण ठेवणेसाठी औषधोपचार केले जातात. त्यामध्ये वेदना आणि ताप कमी करणा-या औषधांचा वापर करतात.

## झिका व्हायरसचे धोके काय आहेत?

न जन्मलेल्या अर्भकास मातेकडून लागण होऊ शकते . त्यामुळे जन्मतःच दोष निर्माण होतात, तसे मेंदूची अपूर्ण वाढ (microcephaly) किंवा गर्भपात होणे. झिका व्हायरसमुळे काही काळाकरीता किंवा कायमस्वरुपी थकवा किंवा अर्धांगवात होऊ शकतो.

## लक्षणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काय करावे?

- द्रव पदार्थांचे मुबलक प्राशन करावे, त्यामुळे शरीरातील पाणी कमी होण्याचा धोका कमी होतो.
- भरपूर विश्रांती घ्यावी

**झिका व्हायरसची लागण होऊ नये यासाठी काय करावे?**

झिका व्हायरसची लागण होऊ नये यासाठी सध्या कोणतीही लस उपलब्ध नाही. झिका व्हायरसची लागण झालेल्या परिसरात जाऊ नये. डासांच्या चाव्यापासून बचाव करावा. डास प्रतिसारकांचा वापर करावा. अशा प्रतिसारकाच्या वापरासंबंधी सूचनांचे अनुपालन करावे. प्रतिसारकांच्या वापरासंबंधी **सूचना-**

- कपडयाच्या आतील शरीरभागावर डास प्रतिसारकांचा वापर करु नये.
- असे प्रतिसारक लावण्यापूर्वी सन स्क्रिनलोशन लावावे.
- बाहेर जातांना , प्रवासात किंवा अधिक धोका संभव आहे अशा ठिकाणी जातांना डास प्रतिसारकांचा वापर करावा. पुर्नवापर सूचनेनुसार करावा.
- लांब बाहयांचे शर्ट व पॅन्ट वापरावी.
- आच्छादने आणि जाळयांचा वापर करावा.
- पाणी साठविण्याची भांडी आठवडयातून एकदा तरी स्वच्छ करावी.

**झिका व्हायरस आणि गर्भावस्था याविषयी काय माहिती असणे आवश्यक आहे?**

- झिका व्हायरसची लागण झालेल्या महिलेने किमान आठ आठवडे (दोन महिने) गर्भधारणा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. त्यामुळे बालकांस होणारे धोके टळतील तसेच झिका व्हायरसचा प्रादुर्भाव झालेला असल्याचे आढळल्यास किमान 8 आठवडे काळजी घ्यावी त्यामध्ये अशा धोकादायक परिसरातील प्रवासाचाही समावेश आहे .
- झिका व्हायरसचा प्रादुर्भाव झालेल्या परिसरात राहणा-या जोडप्यांनी गर्भधारणेपूर्वी याबाबत आरोग्य व्यवसायींचा सल्ला घ्यावा. झिका संसर्गाबाबत दोघांनीही तपासणी करुन घ्यावी.

| **हे करावे** | **हे करु नये** |
|---|---|
| • पाण्याची भांडी झाकून ठेवावी.<br>• वापरण्याची भांडी जसे भंगार डबे,बाटल्या, टायर्स, नारळाच्या करवंटया नष्ट कराव्या<br>• डेझर्ट कुलर्स आठवडयातून एकदा स्वच्छ धुवुन पुसुन कोरडे करावे व मगच भरावे<br>• घरातील फिशटँकमध्ये अळया खाणारे मासे सोडावे.<br>• प्रत्येक आठवडयाला घरातील पाण्याची भांडी, फुलदाण्या, पक्षांसाठी पाणी ठेवण्याचे भांडे, माशांचे पिंजरे धुवुन कोरडे करावे | • घरात व घरासभोवती कुलर्स, बादल्या , पिंप, फुलदाण्या, पक्षांची तळी, फ्रिजचा ट्रे किंवा नारळाच्या करवंटया इ. ठिकाणी पाणी साचू देऊ नये.<br>• फुटकी भांडी, डबे बाटल्या टायर्स आणि इतर भंगार सामान इतस्ततः फेकू नये. पावसाळयात त्यामध्ये डासांची वाढ होण्याची शक्यता असते.<br>• तापावर उपाय म्हणून ॲस्परीन घेऊ नये.<br>• झिका व्हायरसवर अद्याप निश्चित असे औषध नाही. स्वतःहून कोणतेही औषध घेऊ नये. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. |

**Reference:** Micromedex care notes solution.2.1